आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२६ जुलै २०२४ - शुक्रवार

कारगिलमध्ये आपण केवळ युद्ध जिंकलं नाही, तर सत्य, संयम आणि सामर्थ्याचं अतुलनीय उदाहरण जगापुढे ठेवलं असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. २५ व्या कारगिल विजय दिना निमित्त, प्रधानमंत्री मोदी यांनी आज लडाख मधल्या कारगिल युद्ध स्मारकाला भेट दिली. आणि कारगिल युद्धात कर्तव्य बजावताना सर्वोच्च बलिदान देणाऱ्या जवानांना त्यांनी आदरांजली वाहिली. त्यावेळी ते बोलत होते. कारगिल युद्धात असत्य आणि दहशतीला, सत्यापुढे हार पत्करावी लागल्याचं ते म्हणाले. प्रधानमंत्र्यांनी आज दूरस्थ पद्धतीनं लडाख मधल्या शिंकुन-ला बोगदा प्रकल्पाचा पहिला सुरुंग स्फोटही केला.

**राष्ट्रपती** द्रौपदी मुर्मू यांनी कारगिल विजय दिना निमित्त देशाच्या सशस्त्र बलांप्रति कृतज्ञता व्यक्त केली आहे आणि त्यांना आदरांजली वाहिली आहे. **मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि अजित पवार, केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्यासह अनेक मान्यवरांनी** आज कारगिल विजय दिना निमित्त कारगिल युद्धात आपल्या प्राणांची बाजी लावणाऱ्या शूर सैनिकांना अभिवादन केलं आहे.

**<><><><>**

माजी सैनिकांच्या कल्याणासाठी महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल दिली. माजी सैनिकांच्या प्रश्नांचा आढावा घेणाऱ्या बैठकीत ते बोलत होते. सातारा जिल्ह्यातल्या अपशिंगे गावात विकासकामांना प्राधान्य देण्यात येईल. खारघर इथं माजी सैनिकांचं विश्रामगृहही उभं राहणार असून महामंडळाचे विविध उपक्रम, टोलमधून सवलत, रोजगार संधी, वेतनातील तफावत असे अनेक महत्वाचे निर्णय शासनानं घेतले

आहेत. तसंच, मुंबईमध्ये युद्ध संग्रहालय उभं करण्याचा निर्णयही घेण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री शिंदे यांनी दिली.

**<><><><><>**

हवामान विभागाने आज **रायगड आणि सातारा तसंच रत्नागिरी** जिल्ह्यात पावसाचा **रेड अलर्ट** दिला आहे.

**पुण्यात** काल अतिवृष्टीमुळे पसरलेला चिखल आणि गाळ यांच्या सफाईसाठी खाजगी कंपन्यांच्या मदतीने युद्धपातळीवर स्वच्छता मोहीम राबवण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. पाटबंधारे विभागाचे अधिकारी आणि महापालिका यांच्यातल्या समन्वयाअभावी कालची पूरपरिस्थिती उद्भवली. यापुढे प्रशासन तसंच अधिकाऱ्यांनी ही काळजी घ्यावी, असं केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सांगितलं.

मुसळधार पावसामुळे सावित्रीबाई फुले **पुणे** विद्यापीठाच्या आज आणि उद्या होणाऱ्या सर्व परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. विद्यापीठाच्या उर्वरित परीक्षा या नियोजित वेळापत्रकानुसार होतील, अशी माहिती विद्यापीठाच्या परीक्षा विभागानं दिली आहे. **रायगड आणि रत्नागिरी** जिल्ह्यातल्या अतिवृष्टीमुळे मुंबई विद्यापीठाच्या आज सकाळी तसंच दुपारी होणाऱ्या सर्व परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत.

**सांगली** भागातली पूरपरिस्थिती हाताळण्यासाठी वैद्यकीय तसंच अभियांत्रिकी कर्मचाऱ्यांसह शंभर जणांचं लष्करी पथक तैनात केलं आहे. कृष्णा आणि वारणा नदीच्या पाणीपातळीत वाढ होत असल्यानं सांगली मिरजसह अनेक भागातल्या नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आलं आहे. नदीकाठच्या गावांना

सावधानतेचा इशारा दिला आहे. सध्या कोयनेतून ३२ हजार १०० क्यूसेक पाण्याचा विसर्ग होत आहे. जिल्ह्यातल्या काही रस्त्यांवरुन वाहतूक बंद केली आहे.

**कोल्हापूर** जिल्ह्यात राधानगरी, दुधगंगा, वारणा आणि तुळशी या धरणांमधून पाण्याचा विसर्ग सुरु आहे. प्रशासनानं शाळा तसंच महाविद्यालयांना उद्याही सुटी जाहीर केली आहे.

**नंदूरबार** जिल्ह्यातल्या नवापूर तालुक्यात झालेल्या पावसानं सुरत-भुसावळ रेल्वे मार्ग प्रभावित झाला आहे. त्यामुळं या मार्गावरच्या काही गाड्यांचे मार्ग बदलले असून उधना-नंदूरबार मेमो रद्द झाली आहे.

**रायगड** जिल्ह्यात खवळलेल्या समुद्रामुळे अलिबागजवळ अडकलेल्या मालवाहू जहाजावरून चौदा कर्मचाऱ्यांची भारतीय तटरक्षक दलानं सुटका केली.

**नंदुरबार** जिल्ह्यात रंगावली, नेसू तसंच सरपणी नद्यांना पूर आला आहे.

**<><><><>**

संसदेच्या दोन्ही सभागृहात आज कामकाजाची सुरुवात कारगिलमधल्या शहीदांना आदरांजली अर्पण करून झाली. गेल्या सहा वर्षात १६ कोटी ८३ लाख नवीन रोजगार निर्माण झाल्याची माहिती कामगार आणि रोजगार राज्यमंत्री शोभा करंदलाजे यांनी आज संसदेत दिली. या ६ वर्षांच्या कालावधीत देशात एकूण रोजगारामध्ये ३५ टक्के वाढ झाली असल्याचं त्यांनी राज्यसभेत लेखी उत्तरात सांगितलं. सध्या लोकसभा आणि राज्यसभेत अर्थसंकल्पावर चर्चा सुरू आहे.

**<><><><>**

अमरावती नजीकच्या नांदगाव पेठ इथे काल ट्रक आणि कारची धडक झाल्यानं अपघात झाला. या अपघातात दोन ठार तर दोन जण जखमी झाले आहेत,

त्यापैकी एकाची प्रकृती चिंताजनक आहे. मृत आणि जखमी व्यक्ती अकोल्यातल्या मोठी उमरी भागातले रहिवासी आहेत.

<><><><><>

पॅरिस ऑलिम्पिकचा उद्घाटन सोहळा आज होत असून, भारतीय प्रमाण वेळेनुसार रात्री ११ वाजता पॅरिसमधल्या सीन नदीच्या किनाऱ्यावर या भव्य सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं आहे. यावेळी आयोजित परेडमध्ये भारताचं नेतृत्व ऑलिम्पिक पदक विजेती बॅडमिंटनपटू पी व्ही सिंधू आणि टेबल टेनिस पटू शरथ कमल करणार आहेत.

<><><><><>

श्रीलंकेत सुरू असलेल्या महिलांच्या टी-20 आशिया चषक क्रिकेट स्पर्धेच्या उपांत्य फेरीत आज भारताचा सामना बांग्लादेशसोबत होत आहे. बांग्लादेशनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा बांगलादेशच्या १२ षटकांत ५ बाद ३७ धावा झाल्या होत्या.

//<><><><><>//